RNI No. MAHBIL /2009/31745

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक—मध्य उप-विभाग

वर्ष ९, अंक ३५] शुक्रवार, मे १९, २०२३/वैशाख २९, शके १९४५ [पृष्ठे २, किंमत : रुपये ४.००

**असाधारण क्रमांक ५५**

**प्राधिकृत प्रकाशन**

**सामान्य प्रशासन विभाग**

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १८ मे २०२३.

**अधिसूचना**

क्रमांक डीआयपी-२०२३/प्र.क्र. ११६/३०.—**माजी मंत्री श्री. गिरीश भालचंद्र बापट यांचे बुधवार, दि. २९ मार्च, २०२३ रोजी पुणे येथे झालेल्या दु:खद निधनाबद्दल राज्य मंत्रिमंडळाने खालीलप्रमाणे ठराव पारित करून श्रद्धांजली अर्पण केली.**

स्व. गिरीश भालचंद्र बापट यांचे बुधवार, दिनांक २९ मार्च, २०२३ रोजी पुणे येथे दु:खद निधन झाले. स्व. बापट यांचा जन्म ३ सप्टेंबर, १९५० रोजी पुणे जिल्ह्यातील तळेगाव येथे झाला. त्यांचे शिक्षण बी.कॉम. पर्यंत झाले होते.

स्व. बापट यांनी वाणिज्य शाखेची पदवी संपादन केल्यानंतर १९७३ मध्ये ते 'टेल्को' कंपनीमध्ये कामगार म्हणून रुजू झाले. त्यानंतर दोन वर्षांतच आणीबाणीमध्ये १९ महिन्यांचा कारावास नाशिक जेलमध्ये त्यांनी भोगला. तुरुंगात शिक्षा भोगून आल्यानंतर गिरीश बापट यांच्या राजकीय कारकीर्दीला खऱ्या अर्थाने प्रारंभ झाला. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, जनसंघ आणि परिवारातील संस्थांतील विविध पदांची जबाबदारी त्यांनी यशस्वीपणे पेलली.

संघ स्वयंसेवक, कामगार नेता, पुणे महानगरपालिकेत नगरसेवक, आमदार, मंत्री आणि खासदार असा प्रवास केलेल्या स्व.गिरीश बापट यांची एक दिलदार, मोकळ्या मनाचा माणूस अशी ओळख होती. १९८२ मध्ये पहिल्याच प्रयत्नात ते पुणे महानगरपालिकेत नगरसेवक झाले. सलग तीन टर्म त्यांनी नगरसेवकपद राखले. १९८६ मध्ये स्थायी समितीचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी काम पाहिले. १९९५ ला विधानसभेवर ते प्रथम निवडून गेले. १९९५ ते २०१९ या काळात पाच वेळा ते विधानसभेवर निवडून गेले. १९९६ ला ते कृष्णा खोरे विकास महामंडळाचे सदस्य झाले. १९९८ ला एसटी महामंडळाचे अध्यक्ष आणि २००९ ते २०१४ या काळात विधानसभेतील भारतीय जनता पक्षाचे मुख्य प्रतोद, २०१० ते २०१४ या काळात विधानसभेच्या लोकलेखा समितीचे अध्यक्ष, २०१४ ला कॅबिनेट मंत्री अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण, अन्न व औषधी द्रव्ये प्रशासन तसेच संसदीय कार्य विभागाचे मंत्री म्हणून त्यांनी काम केले आहे.

मे, २०१९ ला स्व.गिरीश बापट लोकसभेवर निवडून गेले. केंद्रात अंदाज समितीचे ते अध्यक्ष होते तसेच विविध समित्यांवर सदस्य म्हणूनही ते काम पाहत होते.

सर्वांना सोबत घेताना विरोधकांनादेखील आपलेसे करण्याची गिरीशभाऊ यांची हातोटी होती. कुठलाही राजकीय अभिनिवेश न ठेवता त्यांनी सर्वांनाच मदत केली. पक्षाच्या, राजकारणाच्या पलीकडे जाऊन त्यांनी काम केले आणि सर्वधर्मियांना मदत केली. राज्याच्या मंत्रिमंडळात संसदीय कार्यमंत्री म्हणूनही त्यांचे कार्य नोंद घेण्यासारखे होते.

ज्येष्ठ नेते, माजी मंत्री स्व. गिरीश बापट यांच्या निधनाबद्दल राज्य मंत्रिमंडळ तीव्र शोक व्यक्त करत असून राज्य मंत्रिमंडळाने व्यक्त केलेल्या भावना स्व. गिरीश बापट यांच्या कुटुंबियांना कळविण्यात याव्यात.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**मनोज सौनिक,**
मुख्य सचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.